# Della Leaders Club – DLC Pune | पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांच्या हस्ते जगातील पहिल्या बिझनेस प्लॅटफॉर्म डेला लीडर्स क्लब (DLC) पुणे चॅप्टरचे उद्घाटन

Last updated **Nov 18, 2021** ताज्या बातम्या पुणे




file photo

Share Facebook Telegram Twitter Pinterest

**पुणे : पोलीसनामा ऑनलाइन –** उद्योजक आणि तरुण व्यावसायिकांचा जागतिक समुदाय असणाऱ्या डेला लीडर्स क्लबने (Della Leaders Club – DLC Pune) शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या पुण्यात त्यांच्या पुणे चॅप्टरचे उदघाटन पुणे पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता (CP Amitabh Gupta) यांच्या हस्ते पार पडले. जगातील पहिले बिझनेस प्लॅटफॉर्म म्हणून ओळखला जाणाऱ्या डीएलसीच्या पुणे चॅप्टरच्या (Della Leaders Club – DLC Pune) उदघाटना वेळी पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार (PMC Commissioner Vikram Kumar), पुण्याचे प्रधान आयकर आयुक्त अशोक कुमार पांडे (ashok kumar pandey, Principal Commissioner of Income tax- Pune) आणि SBI चे स्वतंत्र संचालक डॉ. गणेश नटराजन (Dr. Ganesh Natarajan, Independent Director – SBI) उपस्थित होते.

उद्योजकांना "A life of Success to a life of Significance" रूपांतरित करण्यासाठी उत्प्रेरक म्हणून काम करण्याचे उद्दिष्ट डीएलसी चे आहे. डीएलसी हा असा मंच आहे की जो विविध क्षेत्रातील व्यावसायिकांना त्यांच्या क्षेत्रात मजबूत पाठबळ देण्याचे काम करते. उद्योजकांसाठी औद्योगिक क्षेत्रातील माहितीची देवाण घेवाण, लाइफस्टाइल कोचिंग व सामाजिक जबाबदारीवर या वर डीएलसीचे (Della Leaders Club – DLC Pune) अधिक लक्ष केंद्रित आहे. या जागतिक समुदायाच्या जगभरात शाखा असून २६ पेक्षा अधिक औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ येथे सदस्य आहेत.



या वेळी डेला लीडर्स क्लबचे संस्थापक जिमी मिस्त्री (Jimmy Mistry, founder of the Della Leaders Club) म्हणाले की, "डीएलसी पुणे चॅप्टरची आज सुरुवात होत असताना आम्हाला खूप आनंद होत आहे. डीएलसी चा उद्देश उद्योजकांना आणि तरुण व्यावसायिकांना भविष्यातील योग्य व्यावसायिक संस्था तयार करण्यात आणि जगात आपल्या व्यवसायाचा प्रभाव पाडण्यास मदत करणे हा आहे. आजच्या उद्योजकांना फक्त त्यांचा व्यवसाय वाढवण्याकडे लक्ष न देता, उद्योजकांना त्यांच्या क्षेत्रात आणि समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देताना इतरांना मदत करणेही गरजेचे आहे. याच सकारात्मक बदलासाठी डीएलसी आपले योगदान देत आहे व एक उत्प्रेरक होऊ इच्छित आहे'.

डीएलसी ग्लोबल कम्युनिटीमध्ये आज २२५० हून अधिक प्रतिष्ठित पुरुष आणि महिला सहभागी आहेत,
जे २६ पेक्षा अधिक औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ सदस्यांशी १५ ग्लोबल चॅप्टर मधून जोडले आहेत.
हे १५ ग्लोबल चॅप्टर जगातील न्यूयॉर्क, लंडन, दुबई, हाँगकाँग, बँकॉक, सिंगापूर, मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, पुणे, हैदराबाद, चेन्नई, कोलकाता, इन्दोर, आणि अहमदाबाद येथे आहे.

**Web Title :-** Della Leaders Club – DLC Pune | Commissioner of Police Amitabh Gupta inaugurates Pune Chapter of Della Leaders Club (DLC), the world's first business platform